Website : http://www.mscepune.in Email : mscepune@gmail.com दूरध्वनी क्र : ०२०-२६१२३०६६/२४१२३०६७ फॅक्स क्रमांक : ०२०-२६१२९९९९

जा.क्र.मरापप / शिष्यवृत्ती /२०१४/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे १.
दिनांक - ३०/१०/२०१४.

**प्रति,**

१ शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद (सर्व)
२ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
(पश्चिम/उत्तर/दक्षिण)
३ शिक्षणाधिकारी बृहन्मुंबई
महानगरपालिका

**विषय - इ.४थी, ७वी शिष्यवृत्ती परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर स्तरावर भरुन घेण्याबाबत...**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की,

१) परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा मार्च २०१५ साठी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२) शिवाय आवेदनपत्रांचे नमुने, आवेदनपत्र भरण्याच्या सूचना व परीक्षेविषयक अन्य माहिती प्रसिद्ध करण्यात येत आहे.

३) आपल्या जिल्ह्यातील काही तालुके/वार्डातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (जि.प./मनपा/न.पा.,इ..) शाळांना वीज, इंटरनेट सुविधेचा अभाव, इ. कारणांमुळे ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी अडचणी येऊ शकतात. त्यासाठी अशा तालुका/वार्डांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

- i) जि.प./मनपा/न.पा./न.प., इ.. व्यवस्थापनाच्या शाळांची ऑनलाईन आवेदनपत्रे गटशिक्षणाधिकारी / वॉर्ड ऑफिसर कार्यालयात भरुन घ्यावीत.
- ii) दिनांकानुसार आवेदनपत्र भरण्याचा कार्यक्रम ठरवून संबंधित तालुका/वार्डातील शाळांना सूचना देऊन आवेदनपत्र भरुन घ्यावीत.
- iii) इंटरनेट सुविधेसाठी अशा शाळांकडून शुल्क आकारणी करुन नये.
- iv) खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांची आवेदनपत्रे गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर कार्यालयात भरुन घेऊ नयेत.(यापूर्वीच तालुका/वॉर्डांनी विद्यार्थ्यांची माहिती संकलित केली असेल तर ग.शि.अ./वॉर्ड ऑफिसर स्तरावर खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांचीही आवेदनपत्रे भरुन घेण्यास हरकत नाही.)
- v) तालुका/वॉर्ड स्तरावर आवेदनपत्रे भरणाऱ्या शाळांना 'प्रपत्र अ' जमा करण्यासाठी केंद्रप्रमुखांकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकरणी गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड स्तरावरच 'प्रपत्र अ', सोबतची प्रमाणपत्रे व शुल्क भरल्याची चलने जमा करुन घ्यावीत.

४) आपल्या जिल्ह्यातील इच्छुक सर्व शाळांची नियमित शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्रे विहित कालावधीत भरली जातील याची दक्षता घ्यावी.

५) ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याच्या कालावधीत संपर्कासाठी संकेतस्थळावर helpline मोबाईल क्रमांक आणि 'ई' मेल आयडी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यांचा उपयोग करावा.

**व्ही. बी. पायमल**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - १**

# आवेदनपत्र भरण्याबाबतच्या ठळक बाबी

- परिषदेकडून Login Id व Password मिळाल्यानंतर शाळेने सर्वप्रथम शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरणे आवश्यक आहे.
- शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरुन confirm केल्यानंतरच विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरता येणार आहेत.
- ऑनलाईन चलनाची प्रिंट घेऊन बँकेत शुल्क भरल्यानंतर शाळेने चलन अपडेट करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र प्रिंट करण्याची आवश्यकंता नाही. परीक्षेची आवेदनपत्रे भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र अ), असल्यास प्रमाणपत्रे (पालकाचे उत्पन्न २०,०००/- पेक्षा कमी असल्याचे प्रमाणपत्र, पालक भूमिहिन शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र) व शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखांमार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे.
- आवेदनपत्रासाठी विद्यार्थ्यांच्या फोटोची आवश्यकता नाही. मात्र जानेवारी महिन्यात प्रवेशपत्रावर (Hall Ticket) लावण्यासाठी Identy Size फोटो तयार ठेवणे आवश्यक आहे.
- सविस्तर माहिती व सूचनांसाठी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.
- पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा व विद्यानिकेतन (शासकीय, आदीवासी, विमुक्त जाती व भटक्या जमाती) प्रवेश परीक्षा यासाठी एकच आवेदनपत्र आहे. त्यात विद्यानिकेतन प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना विकल्प देण्यात आला आहे.

## ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतचे वेळापत्रक

| | अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|---|
| नियमित शुल्कासह (With Regular | १) | इ. ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे भरणे. ऑनलाईन चलनाची प्रिंट घेणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ४ डिसेंबर २०१४ |
| | २) | चलनाद्वारे बँकेत शुल्क भरणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ |
| | ३) | चलन अपडेट (update) करणे व 'प्रपत्र अ' ची प्रिंट घेणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ८ डिसेंबर २०१४ |
| | ४) | 'प्रपत्र अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे, शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखामार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांचेकडे जमा करुन पोहोच घेणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ९ डिसेंबर २०१४ |
| विलंब शुल्कासह (With Late fees) | ५) | इ. ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे भरणे. ऑनलाईन चलनाची प्रिंट घेणे. | ५ डिसेंबर २०१४ ते १९ डिसेंबर २०१४ |
| | ६) | चलनाद्वारे बँकेत शुल्क भरणे. | ५ डिसेंबर २०१४ ते २० डिसेंबर २०१४ |
| | ७) | चलन अपडेट (update) करणे व 'प्रपत्र अ' ची प्रिंट घेणे. | ५ डिसेंबर २०१४ ते २२ डिसेंबर २०१४ |
| | ८) | 'प्रपत्र अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे, शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखामार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांचेकडे जमा करुन पोहोच घेणे. | ५ डिसेंबर २०१४ ते २३ डिसेंबर २०१४ |
| अतिविलंब शुल्कासह (With Super Late | ९) | इ. ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे भरणे. ऑनलाईन चलनाची प्रिंट घेणे.<br>चलनाद्वारे बँकेत शुल्क भरणे.<br>चलन अपडेट (update) करणे व 'प्रपत्र अ' ची प्रिंट घेणे.<br>'प्रपत्र अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे, शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखामार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांचेकडे जमा करुन पोहोच घेणे. | २० डिसेंबर २०१४<br>ते<br>परीक्षेपूर्वी १५ दिवस अगोदर पर्यंत. |

- इच्छुक विद्यार्थी/पालकांनी शाळेशी संपर्क साधावा. असे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे - १ कळवितात.

जा.क्र.मरापप / शिष्यवृत्ती /२०१४ .
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे १.
दिनांक - ३०/१०/२०१४.

# प्रसिद्धीपत्रक

# MSS/HSS (शिष्यवृत्ती) परीक्षा २०१५

१) **परीक्षेच तारीख** - रविवार दिनांक २२ मार्च २०१५.

२) **परीक्षेचे नाव** - अ) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा, शासकिय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदीवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा. (सर्व परीक्षा इ. ४थी साठी )
ब) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७वी साठी)

३) **परीक्षेचे माध्यम** - मराठी, उर्दू, हिंदी, गुजराथी, इंग्रजी, तेलुगु, सिंधी व कन्नड या आठ माध्यमातून घेतली जाते. शिवाय सेमी इंग्रजी माध्यमही उपलब्ध.

४) **अभ्यासक्रम** -
अ) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा व विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) पुणे यांच्या इयत्ता १ ते ४ च्या अभ्यासक्रमावर घेतली जाते.
ब) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) पुणे यांच्या इयत्ता १ ते ७ च्या अभ्यासक्रमावर घेतली जाते.

५) **शिष्यवृत्तीसाठी पात्रता** - राज्यशासनाचा अभ्यासक्रम (MSCERT) राबविणाऱ्या शाळांतील विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र ठरतात. CBSE/ICSE अभ्यासक्रमांच्या शाळांतील विद्यार्थी परीक्षेस बसू शकतात मात्र त्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. (उर्वरित निकष संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

६) **परीक्षेचे स्वरुप** - MSS व HSS साठी प्रत्येकी तीन प्रश्नपत्रिका असतात. सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) असतात.

७) **शिष्यवृत्ती संच** - इयत्ता ४थी करीता विविध प्रकारचे १६,६८३ आणि इयत्ता ७वी साठी १६,५७८ शिष्यवृत्ती संच मंजूर आहेत. एखादा विद्यार्थी पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्तीसाठी व विद्यानिकेतन प्रवेशासाठी गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास दोहोंचा लाभ दिला जातो.

८) **शुल्क** -
अ) ऑनलाईन आवेदनपत्र नोंदणी शुल्क रु. १०/- (सर्व विद्यार्थ्यांसाठी)
ब) परीक्षा शुल्क रु. ५०/- (महाराष्ट्र शासनाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळेतील मागासवर्गीय - SC, ST, VJNT या प्रवर्गांना परीक्षा शुल्क नाही)
क) शाळा संलग्नता शुल्क रु. २००/- (४थी, ७वी शिष्यवृत्ती, NTS व NMMS परीक्षेसाठी मिळून)

९) **आवेदनपत्र भरण्याची पद्धत** - केवळ ऑनलाईन पद्धतीनेच आवेदनपत्र शाळेमार्फत भरावयाचे आहे.

१०) **संकेतस्थळ** - www.mscepune.in

११) **संपर्क माहिती** - मदत कक्ष मोबाईल क्रमांक : ७७७४०१२४५५, ७७७४०१२४५६.
ईमेल आयडी : mscepune@gmail.com आणि msshss.msce@gamil.com